॥ या बाळांनो ॥

भा. रा. तांबे

या बाळांनो, या रे या
लवकर भरभर सारे या
मजा करा रे मजा मजा,
आज दिवस तुमचा समजा .

स्वस्थ बसे तोचि फसे,
नवभूमी दाविन मी
या नगराला लागुनियां
सुंदर ती दुसरी दुनिया ॥ १॥

खळखळ मंजुळ गाति झरे
गीत मधुर चहुंबाजुं भरे
जिकडे तिकडे फुलें फळें,
सुवास पसरे, रसही गळे .

पर ज्यांचे सोन्याचे,
ते रावे हेरावे
तर मग कामें टाकुनियां
नवी बघा या ही दुनिया ॥ २॥

पंख पाचुचे मोरांना,
टिपति पाखरें मोत्यांना,
पंख फडकती घोड्यांना,
मौज दिसे ही थोड्यांना,

चपलगती हरिण किती
देखावे देखावे
तर मग लवकर धावुनिया
नवी बघा या ही दुनिया ॥ ३॥